# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर- ४१६ ००४.

क्र.कोविमं/शाखा/१२वी गोप. /3333
कोल्हापूर ४१६ ००४.
दिनांक:- १७.०२.२०२०

प्रति,

प्राचार्य,
सातारा/सांगली/कोल्हापूर
जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय,

**विषय: उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० च्या उत्तरपत्रिका तपासणी बहिष्काराबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२० च्या महाराष्ट्र राज्य (कायम) विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृती समितीने उत्तरपत्रिका तपासणीवर बहिष्कार टाकलेला आहे असे पत्र कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

उपरोक्त प्रकरणी नियुक्त केलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विना अनुदानित परीक्षक/नियामक यांना उत्तरपत्रिका मुल्याकंनासाठी देण्यात आलेल्या आहेत. संबंधितांचे उत्तरपत्रिकाचे गठ्ठे स्विकारुन ते प्रचलित पध्दतीप्रमाणे नियुक्त परीक्षक/नियामक यांना परीक्षण/नियमन करणेसाठी देण्यात यावेत.

उत्तरपत्रिका तपासणी कामावर शिक्षकांनी बहिष्कार टाकल्यामुळे काही शिक्षक उत्तरपत्रिका तपासणी/स्विकारणेस नकार दिल्यास अशा शिक्षकांचे आपण आपल्या स्तरावर उत्तरपत्रिका तपासणीबाबत विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित पाहता उदबोधन करुन उत्तरपत्रिका तपासणीसाठी नियुक्त परीक्षक/नियामक यांना देण्यात याव्यात.

जर या शिक्षकांनी उत्तरपत्रिका स्विकारण्यास नकार दिल्यास अशा उत्तरपत्रिका आपल्या कस्टडीत सुरक्षित ठेवण्यात याव्यात. व अशा शिक्षकांची परीक्षक क्रमांक व विषयासह माहिती या कार्यालयास सादर करावी.

बहिष्काराबाबत समितीशी वाटाघाटी झालेनंतर संबंधितांना उत्तरपत्रिकाचे गठ्ठे तपासणीसाठी देण्यात येवून पुढील कार्यवाही आपले मार्फत करण्यात यावी. तसेच उत्तरपत्रिका गठ्ठे कोणत्याही परिस्थितीत मंडळ कार्यालयाकडे अथवा संबंधित कस्टडीकडे परत पाठविण्यात येवू नयेत याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.